# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी पत्रक                                   ता. २२ फेब्रुवारी २०१९</u>

# मनपा दुर्गानगर शाळेतर्फे शहिद जवनांना श्रद्धांजली

**नागपूर,ता. २० :** नागपूर महानगरपालिकेच्या दुर्गानगर उच्च प्राथमिक व माध्यामिक शाळेतर्फे पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर फुलांची रास करून मेणबत्त्या प्रज्वलित करुन शहीद जवानांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीताचे गायन केले.

या कार्यक्रमासाठी प्रिती भोयर, श्री.गोहोकर, ज्येष्ठ शिक्षिका सविता इटनकर, कृष्णा उजवणे, ममता खुदरे, नलिनी वानखेडे, माध्यामिक शाळेचे शिक्षक सुनील डोईफोडे, श्रीकांत गडकरी, सूरज अंधुरे, श्रीमती जयश्री, सुनंदा लोखंडे, उज्ज्वला धारगे, प्रेमा धरणे, ज्योती मेडपीलवार, माधुरी शेंडे, नानू गावंडे, शालिनी माळवी, सुनंदा हांडे, प्रिती पांडे यांच्यासह शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.